माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/००००९२

अपिलार्थी श्री. पवन भिला शिरसाठ

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुख्यालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई- ३०

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुख्यालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई- ३०

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलदिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
०८.०८.२०२५	१७.१०.२०२५	०६.११.२०२५	२७.११.२०२५

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये दिशाभूल करणारी माहिती दिली असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.१०.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २७.११.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०८.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

"भारत सरकारचा (केंद्र सरकार) लाचलुचपत प्रतिबंधक (सुधारीत) कायदा २०१८ (२०१८ चा कायदा क्रमांक १६) या सुधारीत कायद्याची अंमलबजावणी दि. २६.०७.२०१८ रोजी पासून संपूर्ण भारतात लागू झालेला आहे. यासंदर्भात सदर कायदा सन २०१८ साली सुधारीत झाले नंतर त्यात काही नवीन कलमांची वाढ करण्यात आले नंतर महाराष्ट्र राज्य शासनाने, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा कलम १७ नुसार व अन्य कलमानुसार मिळालेल्या अधिकारानुसार मूहाराष्ट्र राज्यात सर्व पोलीस निरीक्षक दर्जाचे अथवा अन्य पोलीस अधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखालील गुन्हे तपासणी करण्याचे व पदर कायद्याखालील गुन्हातील आरोपींना वॉरंटाशिवाय अटक करण्याचे अधिकार देणेबाबत काढलेल्या आध्यादेशाची/नोटीफीकेशनची/शासन निर्णयाची/परीपत्रकाची प्रत माहीतीचे अधिकारात उपलब्ध होणेस विनंती आहे."

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.१०.२०२५ रोजी अपिलार्थींना कळविले की, नमुद मुद्याच्या अनुषंगाने भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम व लाप्रवि Manual अन्वये कारवाई केली जाते. नमुद Manual हे www.acbmaharashtra.gov.in लाप्रविच्या वेबसाईडवर माहिती अधिकार ह्या सदराखाली कलम ४ (१) (b) (ii) & (iii) Format- (B) अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०६.११.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.११.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे लेखी निवेदन दि.१४.१०.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींनी मागितलेली माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे व संकेतस्थळाचा तपशिल अपिलार्थींना कळविण्यात आलेला आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

६. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

16-10-2026

मुंबई
दिनांक : १६.१०.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई